ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

# जागतिकीकरण आणि भारत

**प्रा. डॉ. म.सु.पगारे,** संचालक, भाषाअभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र,
विभागप्रमुख, मराठी विभाग, उमवि, जळगाव
**सौ माधुरी बुधकर ,** रिसर्च स्कॉलर, मराठी विभाग,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव;

*१९९० ला भारताने जागतिकीकरणाचा पर्याय स्वीकारला. जगातले अनेक उदयोगधंदे वेगवेगळया कंपन्यांद्वारे भारतात आले. आणि मोठया प्रमाणात उत्पादन निर्मिती होऊ लागली. स्त्रियांनाही मोठया प्रमाणात संधी मिळू लागल्या. म.फुले व सावित्रीबाई फुले यांच्या परिश्रमाला फळ आले. त्यांनी दिलेल्या शिक्षणाच्या पंखामुळे या आधुनिक युगात स्त्री आपल्या कर्तृत्वाच्या बळावर आकाशात उंच भरारी मारू लागली. आजवर जेथे फक्त पुरूषांची मक्तेदारी होती तिथे आता स्त्रियांनीही प्रवेश केला. तिथे ती विराजमानही झाली. आर्थिक दृष्टया ती सक्षम झाली तरीही तिची होणारी परवड मात्र कायम आहे. अन्याय, अत्याचार, बलात्कार इ. सारखं दुष्ट चक्र चालूच आहे.*

जागतिकीकरण खऱ्या अर्थाने १९९० पासून सुरू झाले असे म्हणायला हरकत नाही. स्थिरीकरण, रचनात्मक बदल, उदारीकरण, आर्थिक सुधारणा अशा अनेक पध्दतीने जागतिकीकरणाचा विचार केला जातो. मुळात जागतिकीकरण म्हणजे मुक्त अर्थव्यवस्था या विचारापर्यंत आपण येऊन पोचलो आहोत. ''जागतिकीकरण म्हणजे स्थानिक वस्तूंची किंवा घडामोडींची जागतिक स्तरावर स्थानांतराची प्रक्रिया हया संज्ञेला उपयोग सहसा आर्थिक जागतिकीकरणाच्या संदर्भात केला जातो. ज्यात व्यापार, विदेशी थेट गुंतवणूक, भांडवल प्रवाह, प्रवास आणि तंत्रज्ञान यांच्या प्रसाराच्या माध्यमाने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला अंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थांसाठी उघडे केले जाते.'' याचाच अर्थ, जागतिकीकरण म्हणजे आर्थिक प्रभुत्वाची स्पर्धा असे म्हणता येईल किंवा जागतिकीकरण म्हणजे नववसाहतवाद, जागतिकीकरण म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्यांना मिळालेला राष्ट्राचा दर्जा. जागतिकीकरण म्हणजे तंत्र–विज्ञान आणि जागतिकीकरण म्हणजे पाश्चात्यीकरण. या सर्व गोष्टींचे एकत्रीकरण म्हणजे जागतिकीकरण होय. या जागतिकीकरणाचा सर्व क्षेत्रांवर परिणाम झाला. तसा तो मानवी जीवनावरही झाला. अशा या जागतिकीकरणाच्या पर्वात स्त्री जीवनाचाही विचार करणे आवश्यक आहे.

स्त्री जीवनाचा वेध घेताना मागे वळून पाहिले तर स्त्रियांच्या अवनतीचेच चित्र दिसते.पूर्वी विवाह बालवयातच होत होते. चुल आणि मुल एवढेच त्याचे कार्यक्षेत्र होते. विद्येला देवता मानणाऱ्या या देशात स्त्रियांना शिक्षणापासून कोसो दूर ठेवण्यात आले. राजघराण्यातील स्त्रियांना मात्र लिहिणे, वाचणे, तलवार चालवणे, युध्दनीतीचे शिक्षण आणि घोडयावरची रपेट या सर्व गोष्टींचे शिक्षण दिले जात होते. ज्या स्त्रिया गायन–नृत्यात पारंगत होत्या त्यांना मात्र समाजात स्थान नव्हते. केवळ मनोरंजन करणाऱ्या म्हणून त्यांच्याकडे पाहिले जायचे. समानात त्यांना हीन लेखले जायचे. पुरूषांचे वर्चस्व स्त्रियांवर अधिक होते. शिक्षण नसल्याकारणाने स्त्री–पुरूषाची गुलाम म्हणून वागवली जात होती. यातच मध्यमयुगीन काळात बहुपत्नीत्वाची कल्पना समाजात रूढ झाली. याचे जागते उदा. म्हणजे बाजीराव मस्तानी हे होय. अंतरधर्मीय प्रेमप्रकरणे जोधा–अकबरच्या आधारे दिसून येतात. आपल्यावर होणाऱ्या विविध अन्यायाची ती धनी होती. अशा या अन्यायाने ती खचली होती. अशातच काही समाजसुधारकांनी स्त्रियांच्या अन्यायाविरोधात आवाज उठविला. बाळशास्त्री जांभेकरांनी १८३४ साली 'दर्पण' या आपल्या वर्तमानपत्रातून सुधारणावादी विचार व्यक्त केले.

लोकहितवादी यांनी 'शतपत्रा'तून स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. म.गो.रानडे, गो.ग.आगरकर यांनी अनिष्ठ प्रथांवर घणाघाती हल्ला चढविला. राजाराममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना केली. सतीप्रथेविरूध्द आवाज उठविला. सतीबंदीचा कायदा करून घेतला. तर इश्वरचंद्र विद्यासागर यांनी स्त्रियांच्या प्रश्नांवर भर देऊन विधवा विवाहास मान्यता देणारा कायदा करवून घेतला. अशाप्रकारे रूढीप्रियता असलेल्या या समाजात एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला हे दोन कायदे अस्तित्वात आले. त्यामुळे स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचे प्रमाण कमी झाले. शीघ्र परिवर्तनवादी विचारवंत आणि सुधारक म. जोतिबा फुले यांनी शिक्षणाशिवाय स्त्रीची प्रगती होणार नाही हे नेमकेपणाने ओळखले आणि मुलींना शिक्षण देऊन सुसंस्कृत करण्याचा वसाच त्यांनी उचलला. १८५१मध्ये मुलींची शाळा सुरू केली. त्यासाठी त्यांनी स्वत:ची पत्नी सावित्रीबाई यांना प्रशिक्षित शिक्षिका म्हणून तयार केले. समाजातील कर्मठ लोकांचा विरोध सहन करून म. जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांना शिक्षण दिले. इतर अनेक सुधारक स्त्रीयांची कौटुंबिक स्तरावर स्थिती सुधारावी म्हणून सतत प्रयत्नशील होते. महर्षी धोंडो केशव कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख इ. समाजसुधारक शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षणाची गंगा खेडोपाडी नेऊन पोचवली.

पाश्चिमात्य समाजातील स्त्रियांचा विचार करायचा झाला तर एकोणिसाव्या शतकात इंग्लंडमध्ये जे.एस्. मिल याने 'Subjection of Woman' स्त्रीचे 'दुय्यमत्व' आणि मेरी बोल्टन क्राफ्ट हिने 'Vindication of the Rights of Woman' हे ग्रंथ लिहून स्त्री हक्क, स्त्री स्वातंत्र्य आणि स्त्री समता यांचा आग्रही पुरस्कार केला. यामुळेच १८३० ते १९३० या काळात स्त्री मुक्ती चळवळीचा पहिला टप्पा सुरू झाला. आंदोलनाच्या या पहिल्या टप्प्यात स्त्रीने जे मिळवले ते मुख्यत: सुधारणांच्या स्वरूपातच होते. घटस्फोट, कुटुंबाच्या संपत्तीवर स्त्रीचा हक्क यासारखे कायदे, तसेच नोकरी, शिक्षण, मतदान यासारखे सहभाग सुरू झाला. कारखानदारीमुळे वाढत्या प्रमाणात स्त्रिया अर्थार्जन करू लागल्या. असे असले तरी समाजाचा स्त्रीकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलला नाही. सुरवातीपासूनच स्त्रियांच्या बाबतीत काही पुर्वग्रह दुषितता होतीच ती अशी की, धर्ममतानुसार स्त्री ही स्वभावत:च मोहाला चटकन बळी पडणारी, जैविक दृष्टीने स्त्री राजकीय व्यवहारात अपात्र होय. साहजिकच स्त्रीला सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्टया अपात्र मानले जाऊ लागले. दुसरा पुर्वग्रह म्हणजे, स्त्रीचा घराबाहेरील वावर हा समाजाच्या दृष्टीने फारच कमी उपयुक्त आहे. हे समज समाजात फार काळापासून ठाण मांडून बसले होते. आजही ते आहेतच.

पाश्चिमात्य देशात भांडवलशाही उत्पादन व्यवस्थेचा विकास झाला आणि उद्योगप्रधान समाज प्रचलित बनल्यामुळे स्त्रियांना शिक्षण आणि रोजगाराची संधी मिळू लागल्या. यामुळे उद्योगप्रधान समाजातील स्त्रिया समान हक्कासाठी लढा देऊ लागल्या. सर्वप्रथम अमेरिकेमध्ये सुसान बी, हिने समतेचा ध्वज फडकवला. त्यानंतर इतरत्र स्त्री समतेचे, स्त्री स्वातंत्र्याचे लढे सुरू झाले. इंग्लंडमध्ये प्रदीर्घ चळवळीनंतर १९१७ मध्ये ब्रिटीश स्त्रियांना मताधिकार मिळाला. १९१८ मध्ये पार्लमेंटमध्ये पहिली स्त्री सदस्य निवडून आली. आणि १९१९ मध्ये पहिली स्त्री मंत्रीपदी विराजमान झाली. अमेरिकेत दुसऱ्या जागतिक युध्दानंतर स्त्रियांमध्ये उच्च शिक्षणाची मोठयाप्रमाणात वाढ झाली. स्त्रिया मोठयाप्रमाणात शाळा, महाविद्यालयातून शिक्षण घेऊ लागल्या. शैक्षणिक क्रांती झाली. स्त्री आपल्या हक्कांसाठी लढली. तिने आपले स्थान पटकावले.

१५ ऑगस्ट १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि भारतात प्रगतीचे आणि विकासाचे वारे वाहू लागले. घटनाधिष्ठित समानता, स्त्री विषयक कायदे, शैक्षणिक प्रसार यामुळे स्त्रियांना कायदयाचे पाठबळ मिळून, समानतेचा अधिकार मिळाला. १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्रसभेने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष आणि त्यानंतर आंतरराष्ट्रीय महिला दशक घोषित केले. या काळा महिलांच्या स्वयंसंघटना वेगाने निर्माण झाल्या. अत्याचारांविरूध्द संघर्ष, स्त्री प्रश्नांविषयी संवेदनशीलता वाढविणे, शासनाच्या धोरणांमध्ये व कायद्यांमध्ये बदल घडवून आणणे. स्त्री विषयक प्रश्नांना संपर्क माध्यमातून प्रसिध्दी मिळवणे, स्त्रीवाद–पुरूषसत्ताक–लिंगवाद या नव्या संकल्पना समाजापर्यंत पोहचवून जाणीवा जागृत करणे. या व्यापक कार्याची जोमाने वाटचाल करायला स्त्री संघटना पुढे आल्या.

१९९० ला भारताने जागतिकीकरणाचा पर्याय स्वीकारला. जगातले अनेक उदयोगधंदे वेगवेगळया कंपन्यांद्वारे भारतात आले. आणि मोठया प्रमाणात उत्पादन निर्मिती होऊ लागली. स्त्रियांनाही मोठया प्रमाणात संधी मिळू लागल्या. म.फुले व सावित्रीबाई फुले यांच्या परिश्रमाला फळ आले. त्यांनी दिलेल्या शिक्षणाच्या पंखामुळे या आधुनिक युगात स्त्री आपल्या कर्तृत्वाच्या बळावर आकाशात उंच भरारी मारू लागली. आजवर जेथे फक्त पुरूषांची मक्तेदारी होती तिथे आता स्त्रियांनीही प्रवेश केला. तिथे ती विराजमानही झाली. आर्थिक दृष्टया ती सक्षम झाली तरीही तिची होणारी परवड मात्र कायम आहे. अन्याय, अत्याचार, बलात्कार इ. सारखं दुष्ट चक्र चालूच आहे.

याच दरम्यान स्त्रीवादाचा जन्म झाला. प्रामुख्याने स्त्रीवाद हा पाश्चात्य विचारधारेतून आला आहे. असा हा स्त्रीवाद म्हणजे काय? तर त्याच्या वेगवगळया व्याख्या केल्या जातात. अश्विनी धोंगडे म्हणतात, ''स्त्रीवाद म्हणजे पुरूषांपासून फारकत घेऊन स्वत:चा सवता सुभा निर्माण करणे नव्हे, पण संस्कृतीच्या हजारो वर्षाच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारून तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करून दिली, त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे.'' याचाच अर्थ असा की स्त्रीला माणूस म्हणून वागवले पाहिजे. तिच्या हक्काचे स्वातंत्र्य तिला मिळाले पाहिजे. स्त्री–पुरूष समानतेच्या पातळीवर ती उमटली पाहिजे. स्त्रीवादाच्या अनेक व्याख्या अनेक विचारवंतांनी आपल्या विचारांच्या आधारे केल्या आहेत त्याच्या मुळाशी हेतू मात्र एकच आहे ते म्हणजे स्त्रीला आपल्या विकासाची द्वारे उघडी करून देणे व माणूस म्हणून तिचा विचार करणे.

एकविसाव्या शतकात भारतात स्त्रीपरिवर्तनाचे वारे वाहू लागले. त्यात आणखी चांगली गोष्ट झाली ती म्हणजे स्त्रियांना स्वातंत्र्याची नवनवीन दालने उघडी झाली. विविध क्षेत्रात ती कार्यरत झाली. सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात तीने आपली कर्तबगारी गाजवली. ८ मार्च या जागतिक महिलादिनाचे महत्त्व साधून ९ मार्च २०११ मध्ये स्त्रियांना राजकारणात पन्नास टक्के आरक्षण मिळाले आहे. यामुळे सर्व स्तरावरील स्त्रियांना आपल्या कर्तृत्वाची चुणूक दाखवता येईल. यातूनच स्त्री सबलीकरण व सक्षमीकरण होईल. आपले विचार, मते, योजना, कृतिशील धडक कार्यक्रम तिला आखता येतील. आपल्या हुशारीची, बौध्दिकतेची आणि कर्तृत्वाची जाणिव करून देता येईल. ग्रामीण स्तरावर महिलांच्या विकासाकरता हे आरक्षण म्हणजे सुवर्ण संधीच ठरले आहे. तसे पाहिले तर राजकारणात आपले वर्चस्व व आपल्या कर्तृत्वाची जाणिव अनेक मातब्बर स्त्रियांनी करून दिली आहे उदा. आपल्या पूर्वाश्रमीच्या पंतप्रधान इंदिरा गांधी, सुषमा स्वराज्य, विमल मुंदडा, केशरताई

क्षीरसागर, ममता बॅनर्जी, उमा भारती, मायावती, मनेका गांधी, सोनिया गांधी जयललिता, वसुंधरा राजे, सुप्रिया सुळे इ. तर भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती होण्याचा मान प्रतिभाताई पाटील यांना मिळालेला दिसतो.

आज स्त्रियांनी शिक्षणाच्या माध्यमातून आपली प्रगती केली आहे. मोठया–मोठया पदांवर त्या आरूढ झाल्या आहेत. आर्थिक दृष्टया त्या सक्षम झाल्या आहेत. दाही दिशा तिल्या खुल्या आहेत असे असले तरी अनेक आव्हाने तिच्यासमोर उभी आहेत. घर आणि दार हया दोन्ही गोष्टी त्यांना पहाव्या लागतात. आपल्या कुटुंबाची जबाबदारी पेलताना तिची तारेवरची कसरत सुरू आहे. बाहेरच्या जगातील अनिष्ट प्रकारांपासून आपल्या लेकरांना जपण्याचा ती प्रयत्न करते. लैंगिक शोषणाचे प्रकार, एकतर्फी प्रेम प्रकरण यामुळे भितीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. स्त्रीभ्रूणहत्यांचे वाढते प्रमाण मनात चिंतेचे वातावरण निर्माण करणारे आहे. त्याचप्रमाणे स्त्री जन्माला मिळणारा नकार त्यातून दिसून येतो. त्यातील भयानकता लोकांच्या लक्षातच येत नाही. या सर्व बाबतीतील पुरूषांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. ती बदलली तर भितीचे हे वातावरण निवळेल व एक सशक्त, सुदृढ समाज जन्माला येईल. आज 'लेक वाचवा' ही मोहीम सरकारने सुरू केली आहे. गावपातळीपासून ते शासनपातळीपर्यंत मुलीच्या जन्मानंतर बॅकेत ठेव ठेवली जाते. यासारखे प्रयत्न शासनानेही केलेले दिसतात. युग बदलत चालले आहे. बदलणाऱ्या परिस्थिला महिलांनी खंबीर तोंड दिले पाहिजे. मनोबल, हिंमत, धैर्य खचू न देता आपले जीवनकार्य पुढे नेणे व सर्व क्षेत्रात आपले स्थान कायम राखण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. बदलाला वळण लावण्यापेक्षा वळणामध्ये बदल घडविणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. स्मृती निवडक साऱ्या जणी – (संपा.) डॉ. निलिमा गुंडी
२. महिलांचे राजकीय सक्षमीकरण .– डॉ. दीपक पवार
३. स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन – डॉ. आश्विनी धोंगडे
४. स्त्री प्रश्नांची वाटचाल परिवर्तनाच्या दिशेने – विद्युत भागवत
५. संदर्भासहीत स्त्रीवाद – वंदना भागवत, अनिल सपकाळ, गीताली वि.म.